महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर

# कृत्रिम रेतन






कृत्रिम रेतनामध्ये उच्च प्रतीच्या व उच्च क्षमतेच्या वळूचे वीर्य नळीच्या सहाय्याने पशुवैद्यक किंवा कुशल तंत्रज्ञामार्फत गायी/म्हशीच्या योनीमार्गे गर्भाशयात सोडले जाते.

## कृत्रिम रेतन कशासाठी ?

१. उच्च उत्पादनक्षम आणि सिद्ध वळूपासून भरपूर संततीची पैदास करता येते.

२. संकलीत वीर्य अति-शीत पद्धतीने साठविता येत असल्याने बराच काळ टिकते.

३. पशुपालकांचा वळू पोसण्याचा खर्च वाचतो.

४. वीर्य संकलन केंद्रावर ठेवलेल्या वळूची क्षमता पशुवैज्ञानिकांनी सिद्ध केलेली असते. त्यामुळे उत्तम पैदाशीची खात्री मिळते.

५. कृत्रिम रेतन पद्धतीने जननेंद्रियाच्या रोगप्रसारावर आळा बसतो.

## कृत्रिम रेतन कधी करावे ?

| जनावर माजावर येण्याची वेळ | कृत्रिम रेतनाची वेळ |
|---|---|
| सकाळी | संध्याकाळी |
| दुपारी | रात्री उशिरा |
| संध्याकाळी | दुसऱ्या दिवशी सकाळी |
| रात्री उशिरा | दुसऱ्या दिवशी दुपारी |

## कृत्रिम रेतनानंतर....

- १८ ते २१ दिवसांनी माजाच्या लक्षणांसाठी जनावरांकडे लक्ष द्यावे.
- तीन महिन्यांनी गर्भधारणा तपासणी करून घ्यावी.
- वारंवार कृत्रिम रेतन करून जनावर गाभण राहत नसेल तर पशुवैद्यकाचा सल्ला घ्यावा.

**तंत्र कृत्रिम रेतनाचे । प्रजोत्पादन उच्च वंशावळीचे ।।**

पशुविज्ञान व पशुसंवर्धन विस्तार शिक्षण विभाग, प.वै.म., उदगीर